# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.03.2025** **वारःशनिवार**

---

1. गृहमंत्री अमित शहा आजपासून तीन दिवसांच्या ईशान्य भारताच्या दौऱ्यावर
2. होळीचा सण काल उत्साहात साजरा
3. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत महाराष्ट्र देशात द्वितीय क्रमांकावर आणि
4. खाण क्षेत्राला नवी उर्जा देण्यासाठी शोध परवान्यांचा लिलाव

अमित शहा-आसाम दौरा

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा आजपासून तीन दिवसांच्या ईशान्य भारताच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते, विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्धघाटन होणार आहे. ते आज लाचित बारफुकन पोलीस अकादमी आणि अकादमीसाठीच्या गृहप्रकल्पाचं उद्घाटन करतील. यावेळी मुख्यमंत्री हेमंता बिश्व शर्मा आणि केंद्रिय मंत्री सर्वानंद सोनोवाल गोलाघाट जिल्ह्यातील डेरगाव इथ उपस्थित असतील. मिझोरममध्ये, अमित शाह आसाम रायफल्सच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. उद्या कोकराझार जिल्ह्यातील डोटमा ऑल बोडो स्टुडंट्स युनियनच्या 57 व्या वार्षिक परिषदेला संबोधित करतील आणि त्यानंतर गुवाहाटीमध्ये आठ ईशान्येकडील राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार आहेत.

**<u>होळी</u>**

होळीचा रंगोत्सव देशभरांत काल उत्साहात साजरा करण्यात आला. विविध भागात सांस्कृतिक, सामाजिक तसंच पारंपरिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. उत्तर प्रदेशात, ब्रज मंडळापासून अयोध्या धामपर्यंत संपूर्ण राज्यात होळीचा उत्साह होता. हे सण परस्पर सुसंवाद, शांतता आणि समानतेचं प्रतीक असले पाहिजेत असं गोरखपूरमध्ये भगवान नृसिंह विश्व यात्रेची सुरुवात करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितलं. बिहारमध्ये, धार्मिक दिनदर्शिकेनुसार मगध, मिथिला शहाबाद, तिरहुत, कोसी आणि सीमांचल प्रदेशातील लोक आज होळी साजरी करतील.

पुण्यात काल भोई प्रतिष्ठानतर्फे विशेष मुलांसाठी 'रंग बरसे' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये अनाथ, एचआयव्ही बाधित, गतीमंद, दिव्यांग, देवदासी भगिनींची मुलं, डोंबाऱ्याचा खेळ करणाऱ्या मुलांबरोबर रंगोत्सव साजरा करण्यात आला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीदेखील यामध्ये भाग घेतला.

सैन्यदल, सीमा सुरक्षा दल, केंद्रिय राखीव दलातील कर्मचाऱ्यांनी आपलं कर्तव्य निभावत दुर्गम भागातील चौकीच्या ठिकाणीही होळीचा आनंद लुटला. दरम्यान, महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर भागात काल उल्हास नदीत चार किशोरवयीन मुलांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. 15-16 वयोगटातील आणि ही मुले होळी साजरी केल्यानंतर नदीत उतरली होती आणि पाण्याची पातळी अचानक वाढल्याने ते वाहून गेले अशी माहिती पोलीसांनी दिली.

**<u>खाण क्षेत्र</u>**

देशभरातील खाण क्षेत्राला चालना देण्यासाठी खाण मंत्रालयानं गोवा सरकारच्या सहकार्याने भारतातील पहिल्याच शोध परवान्यांच्या लिलावाची सुरुवात केली. केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी आणि गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोव्यात झालेल्या एका कार्यक्रमात या उपक्रमाचं काल उद्घाटन केलं. हा लिलाव 13 शोध परवाना खाणक्षेत्रावर आधारित असेल, ज्यामध्ये

भुगर्भातील दुर्मिळ खनिजं, जस्त, तांबे आणि हिरा यासारख्या महत्त्वाच्या खनिजांचा समावेश असेल. या पारदर्शक, ऑनलाइन बोली प्रक्रियेचा उद्देश नियोजित पध्दतीनं संशोधनाला गती देणं आणि खनिज आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करणे असा आहे. कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारित संशोधनाला चालना देण्यासाठी हॅकेथॉनचं उद्घाटनही यावेळी करण्यात आलं.

**जागतिक ग्राहक हक्क दिवस**

आज जागतिक ग्राहक हक्क दिवस आहे. ग्राहकांच्या हक्काचं रक्षण करणं आणि त्यासंदर्भात जागरुकता निर्माण करण्च्या उद्देशानं विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ग्राहकांनी शाश्वत जीवनशैली स्विकारून न्याय्य पध्दतीनं वाटचाल करण्याला प्रोत्साहन द्यावं अशी आजच्या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. केंद्र सरकाच्या वतीनं सर्व स्तरावरील ग्राहकांच्या तक्रारींचं निवारण करण्याच्या उद्देशानं 'जागो ग्राहक जागो' हा उपक्रम राबवला जातो. तसंच राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनद्वारे एक हजाराहून अधिक कंपन्यांशी भागीदारी केली आहे. ई-कॉमर्समधील अनुचित व्यापार टाळण्यासाठी, ग्राहक व्यवहार विभागाने ग्राहक संरक्षण (ई-कॉमर्स) नियम, 2020 अधिसूचित केले आहेत. या नियमांद्वारे ई-कॉमर्स कंपन्यांची दायित्व, रूपरेषा आणि बाजारपेठेतील त्यांचं अस्तित्व याबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे. ज्यामध्ये ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या तरतुदींचा समावेश आहे.

**पाकिस्तान आरोप**

पाकिस्तानमध्ये नुकत्याच झालेल्या रेल्वे अपहरणाच्या घटनेशी भारताचा कोणताही संबंध नाही, पाकिस्ताननं भारतावर केलेले आरोप निराधार असल्याचं भारतानं स्पष्ट केलं आहे. याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल हे स्पष्टीकरण दिलं. जागतिक दहशतवादाचे केंद्र कुठे आहे हे संपूर्ण जगाला माहिती आहे. पाकिस्तानने स्वतःच्या अंतर्गत समस्या आणि अपयशांचा दोष इतरांवर ढकलण्याऐवजी देशांतर्गत समस्यांकडे लक्ष द्यावं अशा शब्दात जयस्वाल यांनी पाकिस्तानला प्रत्युत्तर दिलं.

**सुर्यघर-मुंबई**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत 1 लाख 92 हजार 936 सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्रानं देशभरात दुसरं स्थान मिळवल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावर काल दिली. गेल्या वर्षी 13 फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या योजनेत देशभरात गेल्या 10 मार्च पर्यंत 10 लाख 9 हजार सौर उर्जा प्रकल्प बसवण्यात आले. या योजनेत महाराष्ट्र आपलं योगदान देत राहील तसंच 2026-27 पर्यंत 1 कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**कॅनडा-पंतप्रधान**

कॅनडाचे नवीन पंतप्रधान म्हणून मार्क कार्नी यांनी काल शपथ घेतली. कार्नी यांच्यासह नवीन मंत्रिमंडळातील 24 सदस्यांनी देखील शपथ घेतली. या नवनिर्वाचित मंत्रिमंडळात 13 पुरुष आणि 11 महिला मंत्र्यांचा समावेश आहे. पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर झालेल्या पहिल्या पत्रकार परिषदेत बोलताना, कॅनडा मूलतः वेगळा देश असून, तो कधीही अमेरिकेचा भाग बनणार नाही असा निर्धार व्यक्त केला. मात्र, जर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कॅनडाच्या सार्वभौमत्वाचा आदर राखणार असतील तर आपण त्यांना भेटण्यास तयार असल्याचं कार्नी यांनी सांगितलं.

**सुनीता विल्यम्स**

अमेरिकन अंतरिक्ष संस्था नासा आणि स्पेसएक्स या संस्थेच्या 'क्रू-10' या अभियानाअंतर्गत, 'फाल्कन 9' हे अवकाशयान आज सकाळी अवकाशांत झेपावलं. यामुळं गेल्या जून महिन्यापासून अंतराळात असलेल्या सुनिता विलियम्स आणि बूच बिलमोर यांचा पृथ्वीवर परत येण्यासाठीच्या आशा उंचावल्या आहेत.

**इराण**

इराणच्या विस्तारत असलेल्या आण्विक कार्यक्रमाबद्दल तसंच बहुराष्ट्रीय चर्चा पुन्हा सुरु करण्याबद्दल चीन, रशिया आणि इराणच्या प्रतिनिधींची काल बिजींगमध्ये बैठक झाली. तिन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी 'सर्व बेकायदेशीर एकतर्फी निर्बंध' रद्द करण्याची गरज आहे. राजकीय सहभाग आणि परस्पर आदरावर आधारित संवाद, हाच या समस्येचे निराकरण करण्याचा एकमेव व्यवहार्य मार्ग असल्याचं तीनही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे.

**<u>इराण-अमेरिका निर्बंध</u>**

दरम्यान, इराणच्या तेल आयाती संदर्भात अमेरिकेनं नुकतेच इराणवर निर्बंध लादले आहेत. या निर्बंधांचा इराणने तीव्र निषेध केला आहे. हे निर्बंध इराणच्या विकासाला मारक असून, यातून केवळ अमेरिकेचा इराणशी असलेला वैरभाव दिसून येतो असं प्रतिपादन इराणच्या परराष्ट्र मंत्रालायचे प्रवक्ते इस्माईल बघेई यांनी म्हंटलं आहे. अमेरिकेने लादलेले हे एकतर्फी आणि बेकायदेशीर निर्बंध आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन असल्याचं त्यांनी म्हंटलं आहे.

**<u>परकीय गंगाजळी</u>**

चालू महिन्याच्या 7 तारखेला संपलेल्या आठवड्यात भारताच्या परकीय चलन साठ्यात 15 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात सोन्याचा साठाही एक अब्ज डॉलर्सने वाढून 74 अब्ज 32 कोटी डॉलर्सपेक्षा जास्त झाला. याशिवाय, विशेष आहरण अधिकार 21 कोटी 20 लाख डॉलर्सने वाढून 18 अब्ज 21 कोटी डॉलर्स झाले आहेत. तसंच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील रिझर्व्ह बँकेची पत 6 कोटी 90 लाख डोलर्सने वाढून 4 अब्ज 14 कोटी डॉलर्सहून अधिक झाली आहे.

**<u>देव मुखर्जी-निधन</u>**

हिंदी चित्रपटनिर्माते आणि अभिनेते देव मुखर्जी यांचं काल दिर्घ आजारानंतर मुंबईत निधन झालं. ते 83 वर्षांचे होते. 1960 आणि 1970 च्या दशकात, तू ही मेरी जिंदगी, अभिनेत्री, दो आंखे, बातों बातों में, जो जीता वही सिकंदर, किंग अंकल आणि कमीने यांसारख्या चित्रपटांमध्ये सहाय्यक अभिनेता म्हणून काम केलं. त्यांनी 1983 मध्ये कराटे चित्रपटाचं दिग्दर्शन आणि निर्मिती देखील केली.

**<u>बॅडमिंटन</u>**

ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताचं पुरुष एकेरी आणि महिला दुहेरीतील आव्हान संपुष्टात आलं आहे. पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व सामन्यात लक्ष्य सेनचा, चीनच्या शी फेंग ली याने पराभव केला तर महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व सामन्यात ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना चीनच्याच जोडीकडून पराभव पत्करावा लागला. भारताची दोन वेळा ऑलिंपिक सुवर्ण पदक विजेती महिला खेळाडू पी. व्ही. सिंधु स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत गारद झाली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.